नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३१२ Issue - 312 | वार शुक्रवार दि. ३ एप्रिल २०२६ Blow- Friday Date 3 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# कोल्हापूर, सोलापूर, विदर्भ, मराठवाड्यात अवकाळी पाऊस

## पंचनामे करण्याच्या सूचना; १ लाख २२ हजार हेक्टरहून अधिक क्षेत्रावर नुकसान, अनेक पिकांनी टाकली मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील अनेक जिल्ह्यात विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली असून कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाड्यातही पावसाने दमदार आगमन केले. कडक उन्हाळ्याने नागरिक त्रस्त झाले असतानाच त्यांना पावसाच्या हलक्या सरींनी गारवा अनुभवायला मिळाला. मात्र, अवकाळी आलेल्या या पावसाने शेतकऱ्यांच्या फळबागांचे नुकसान झाले असून शेतकरी चिंतेत असल्याचं दिसून आलं. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातही झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतीचे नुकसान झालं आहे. फळभाज्या, पालेभाज्यासह कलिंगडाचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झालं.

भंडाऱ्यात विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाची हजेरी झाली. उन्हाळी भात पिकाला याचा फायदा होणार असला तरी, कापणीला आलेलं पीक आणि पालेभाज्यांना याचा काही प्रमाणात फटका बसणार आहे. मराठवाड्यात मागील दोन दिवसांत झालेल्या गारपीट अवकाळी पावसामुळे १२२ गावांतील ५ हजार ४०९ शेतकऱ्यांना फटका बसला असून, ३ हजार २६१ हेक्टरवरील शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. त्यात सर्वाधिक २ हजार ६६५ हेक्टरवरील नुकसान छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आहे.



बीडमध्येही अवकाळी आणि गारपिटीचा फळबागांना फटका, फळ गळतीने बागांचे नुकसान झाले आहे. तसेच, धाराशिव जिल्ह्यात देखील अवकाळीचा पुन्हा तडाखा बसला, वादळवाऱ्याने आणि गारपिटीने आंब्याला मोठा फटका बसला असून बळीराजाचं नुकसान झालंय. लातूरमध्ये अवकाळी पावसाने टोमॅटो उत्पादकांचे कंबरडे मोडले असून खराब झालेले टमाटे उकिरड्यावर फेकण्याची वेळ आलीय. उत्तर महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यात सलग तिसऱ्या दिवशी अवकाळी पावसाचा तडाखा बसला, ज्यामध्ये हजारो हेक्टरवरील पिके जमीनदोस्त झाली आहेत. वाशिम जिल्ह्यातही वादळी वारा आणि पावसामुळे बिजवाई कांद्याचे नुकसान झाले. नागपूर जिल्ह्याला मध्यरात्री अवकाळी पावसाने चांगले झोडपले, सतत दोन तास झालेल्या या पावसाने विशेष करुन पालेभाज्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा आणि साक्री तालुक्याला पुन्हा एकदा अवकाळी पाऊस आणि गारपिटीचा फटका बसला. तर, नागपूरातील कळमना एपीएमसी मार्केटमध्ये अवकाळी पावसात शेकडो पोती धान्य भिजलं. धाराशिवमध्ये पुन्हा वादळी वाऱ्यासह अवकाळीचा तडाखा बसला. टॉमटो शेती जमीनदोस्त झाली असून शेतकऱ्यांच मोठ आर्थिक नुकसान झालं आहे. कळंब तालुक्यातील बहुला शिवारातील शेतकऱ्यांच्या टोमॅटो पिकाचेही मोठं नुकसान झालं आहे.

उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात अवकाळी पाऊस झाला असून पिकांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या असून नुकसानभरपाई देण्यात येणार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

मंत्रिमंडळाची काल बैठक झाली, त्यामध्ये तात्काळ मुख्यमंत्र्यांनी अवकाळी पावसाच्या अनुषंगाने पंचनामे करण्याचे आदेश दिलेले आहेत. दरवर्षी हवामानामध्ये बदल मोठ्या प्रमाणात होत आहेत, पाऊस गारपीट यामुळे शेतीचे नुकसान होत आहे. केंद्र सरकारच्या निकषाप्रमाणे शेतकऱ्यांना मदत देण्याचे काम सरकारने केले आहे, अशी माहिती मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली. तर, आधीचे ऐतिहासिक पॅकेज म्हटलेलं अजूनही शेतकऱ्यांना मिळालेलं नाही, एक एक थेंब त्यातील देत आहे. निसर्गाने झोडपले आणि आता राजाही तसाच आहे, शेतकरी कुणाकडे जाणार? असा सवाल अंबादास दानवे यांनी उपस्थित केलाय.

राज्यात वादळी वारा व गारांच्या पावसामुळे (अवकाळी) १ लाख २२ हजार हेक्टरहून ( ३ लाख ५ हजार एकर) अधिक क्षेत्रावरील शेती पिकांचे नुकसान झाले आहे. राज्यभरातील नुकसानीची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून घेऊन तातडीने पंचनामे पूर्ण करुन बाधित शेतक-यांना लवकरात लवकर मदत दिली जाईल अशी माहिती राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

# होर्मुझची सामुद्रधुनी सुरु करण्यासाठी ३५ देशांची बैठक, ब्रिटनकडून भारताला आमंत्रण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: अमेरिका - इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर जगभरात ऊर्जासंकट निर्माण झालं आहे. याचं कारण होर्मुझची सामुद्रधुनी आहे. होर्मुझची सामुद्रधुनी बंद किंवा नियंत्रित करत इराणनं अमेरिका आणि इस्त्रायलची कोंडी केली आहे. होर्मुझची सामुद्रधुनी जगभरातील ऊर्जा साधनांच्या वाहतुकीसाठी महत्त्वाचा मार्ग आहे. या सामुद्रधुनीतून होणारी वाहतूक इराणनं रोखल्यानं जगभरात ऊर्जासंकट निर्माण झालंय. या पार्श्वभूमीवर ब्रिटननं पुढाकार घेतला आहे. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टॉर्मर यांनी ३०-३५ देशांची बैठक बोलावली आहे. या बैठकीला भारताला देखील आमंत्रण देण्यात आलं आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या मुद्यावरील बैठकीला ३५ देशांची बैठक आयोजित करण्यात आली आहे. ब्रिटनकडून भारताला या बैठकीसाठी आमंत्रण देण्यात आल्याचं भारताच्या विदेश मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी म्हटलं आहे. भारताकडून विदेश सचिव विक्रम मिसरी या बैठकीला ऑनलाईन पद्धतीनं उपस्थित असणार आहेत. होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा सुरु करणे आणि ऊर्जा साधनांचा पुरवठा पूर्ववत करणे हा या बैठकीचा उद्देश आहे.

# सात जिल्ह्यांचे कलेक्टर बदलले; २५ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य सरकारने बदल्यांचे सत्र सुरू ठेवले असून, गुरुवारी विविध जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिका आयुक्तांच्या बदल्या करण्यात आल्या. यात सात जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, पाच महागनरपालिका आयुक्त आणि चार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा समावेश आहे. गुरूवारी करण्यात आलेल्या बदल्यांमध्ये कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या जागी डॉ. विजय राठोड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तर, येडगे यांची छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या महापालिका आयुक्त पदी नियुक्ती करण्यात आली आहे. यासोबतच, किरण पाटील हे नवे पशुसंवर्धन आयुक्त असतील. तर, दीपक सिंगला यांची नियुक्ती महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर आयुक्तपदी करण्यात आली आहे. जी. श्रीकांत यांची जल जीवन मिशन, नवी मुंबईचे मिशन संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

दिलीप स्वामी यांची महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर, प्रजीत



नायर यांची पुणे महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर, अंकित यांची नियुक्ती नागपूर महानगरपालिकेच्या अतिरिक्त महापालिका आयुक्त म्हणून करण्यात आली आहे. के. मंजुलक्ष्मी यांची पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे मध्ये अतिरिक्त आयुक्तपदी तर, वर्षा ठाकूर-घुगे यांची महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबईच्या सह मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**महापालिका आणि आयुक्त**

छत्रपती संभाजीनगर - अमोल येडगे., जालना - अंजली शर्मा., अमरावती - वर्षा लड्ढा., कोल्हापूर - डॉ. राजेंद्र भारूड, सांगली मिरज कुपवाड शहर - संजीता महेपात्रा

**जिल्हा आणि जिल्हाधिकारी**

बुलडाणा - डॉ. प्रवीणकुमार देवरे., लातूर - डॉ. भारत बास्टेवाड., कोल्हापूर - डॉ. विजय राठोड., गोंदिया - डॉ. मंगेश गोंदावले/, चंद्रपूर - वसुमना पंत., सोलापूर - कार्तीकेयन एस., नागपूर - कुमार आर्शिवाद

**जिल्हा परिषद - मुख्य कार्यकारी अधिकारी**

छत्रपती संभाजीनगर - मिन्नू पी. एम.., जालना - कृष्णकांत कनवारिया., अमरावती - सत्यम गांधी., कोल्हापूर - डॉ. जॅसमिन

**परिवहन मंत्री प्रताप सरनाईक**

# अवैध प्रवासी वाहतुकीवर आळा घालण्यासाठी कडक भूमिका घेणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील वाढत्या अवैध प्रवासी वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मोटार परिवहन विभाग व एसटी महामंडळाची उच्चस्तरीय आढावा बैठक पार पडली. या बैठकीत राज्यातील सद्यस्थितीबाबत गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली असून, तातडीने आणि प्रभावी उपाययोजना राबविण्याचे निर्देश देण्यात आले.





बैठकीत सादर करण्यात आलेल्या १ महिन्याच्या अहवालानुसार, राज्यात अवैध प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचे निदर्शनास आले. अपेक्षित प्रमाणात कारवाई होत नसल्याची नोंद करण्यात आली असून, त्यामागील प्रमुख कारणे म्हणजे स्थानिक स्तरावर आदेशांची प्रभावी अंमलबजावणी न होणे, तसेच एसटी व आर.टी.ओ. विभागांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याचे स्पष्ट झाले.

विशेषतः, एसटीकडून कारवाईसाठी उपलब्ध करून दिलेल्या वाहनांचा काही ठिकाणी गैरवापर होत असल्याचे गंभीर निरीक्षण नोंदविण्यात आले. काही ठिकाणी या वाहनांचा वैयक्तिक वापर केल्याच्या तक्रारीही समोर आल्या. याशिवाय, राज्यातील ५९ प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांपैकी केवळ २० कार्यालयांना एसटी कडून आवश्यक वाहन व मनुष्यबळ उपलब्ध असल्याचे आढळून आले.

दर १० दिवसांनी कारवाई अहवाल सादर करण्याचे निर्देश असतानाही अनेक ठिकाणी त्याचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आले. काही भागांत केवळ दिखाऊ कारवाई होत असल्याची नोंद करण्यात आली असून, आर.टी.ओ. अधिकाऱ्यांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याबद्दलही नाराजी व्यक्त करण्यात आली.

यावेळी मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट निर्देश देताना सांगितले की, अवैध वाहतूक रोखण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करणे अत्यावश्यक आहे. एसटीकडून उपलब्ध करून दिलेल्या वाहनांचा वापर केवळ कारवाईसाठीच करण्यात यावा आणि त्याचा कोणताही गैरवापर सहन केला जाणार नाही. तसेच, आर.टी.ओ.च्या सर्व ५९ कार्यालयांना आवश्यक संसाधने उपलब्ध करून देण्यासाठी एसटीने तातडीने कार्यवाही करावी, असेही निर्देश देण्यात आले. प्रत्येक संयुक्त कारवाईचा फोटो व लेखी अहवाल मुख्य कार्यालयात सादर करणे बंधनकारक करण्यात आले असून, निष्क्रिय व जबाबदारी टाळणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला.

याशिवाय, एसटीने बेकायदेशीर मार्ग व वाहनांची माहिती नियमितपणे संकलित करून आर.टी.ओ. विभागास देणे, संगनमत व गैरप्रकारांविरोधात स्वतंत्र चौकशी समिती नेमणे, तसेच ड्रोन व फोटो रिपोर्टिंगसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून कारवाई अधिक पारदर्शक करण्याचे निर्देशही देण्यात आले.

ही बैठक राज्यातील अवैध प्रवासी वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केले आहे.

# राज्याच्या महसूल विभागाच्या सुधारित आकृतीबंधानुसार ३५ हजार ८७६ पदांसह प्रशासकीय रचनेत मोठे बदल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील महसूल प्रशासनातील कामाचा वाढता व्याप आणि नागरिकांना जलद सेवा मिळावी, या उद्देशाने महसूल विभागाचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विशेष पुढाकाराने घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे महसूल विभागाच्या रचनेत मोठे बदल होणार असून एकूण ३५ हजार ८७६ पदांना मंजुरी देण्यात आली आहे. मुद्रांक, भूमी अभिलेख आणि महसूल विभाग या तिन्ही विभागांचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे.

तब्बल वीस वर्षांनंतर महसूल विभागातील क्षेत्रीय कर्मचाऱ्यांचा सुधारित आकृतीबंध सरकारने मान्य केला असून आज याबाबतचा शासन निर्णय जारी झाला आहे. याआधी, महसूल विभागातील क्षेत्रीय कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध २००६ मध्ये झाला होता. मागील वीस वर्षांत महसूल व बिगर महसुली कामात अनेक बदल झाले, त्यामुळे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्याशी याबाबत चर्चा केली. त्यानंतर, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीने या आकृतिबंधाला मान्यता दिली. महसूल विभागातील ३४ हजार ५७६ नियमित व १३०० बाह्यस्रोतांद्वारे असे मिळून ३५,८७६ पदांचा आकृतीबंध महाराष्ट्र शासनाने मान्य केला आहे.



प्रशासकीय पुनर्रचना आणि नवीन कार्यालये : शासनाने महसूल विभागाची नवीन संरचना निश्चित केली असून, यामध्ये विभाग, जिल्हा आणि तालुका पातळीवरील कार्यालयांचा समावेश आहे. यात ६ विभागीय आयुक्तालये, ३६ जिल्हाधिकारी कार्यालये, १९२ महसूल उपविभागीय कार्यालये आणि ३६० तहसीलदार कार्यालयांचा समावेश आहे. तसेच क्षेत्रीय स्तरावर २,६२५ मंडळ कार्यालये आणि १५,७४७ तलाठी साजांची पदे मंजूर करण्यात आली आहेत. प्रशासकीय सोयीसाठी ११ नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालये आणि ८ नवीन उपविभागीय कार्यालय, २ तहसीलदार कार्यालय, ६९ अपर तहसीलदार कार्यालयांना मान्यता देण्यात आली आहे. राज्यातील महसूल यंत्रणा अधिक लोकाभिमुख आणि सक्षम करण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या विषयाचा सातत्याने पाठपुरावा केला होता. उमाकांत दांगट समितीच्या शिफारशींनुसार हा सुधारित आराखडा तयार करण्यात आला असून, यामुळे महसूल विभागाच्या कामकाजात आधुनिकता आणि वेग येणार आहे. नवीन कार्यालयांचे मुख्यालय आणि कार्यक्षेत्र निश्चित करण्याची प्रक्रिया आता जिल्हाधिकारी स्तरावर वेगाने पूर्ण केली जाणार आहे.

महसूल विभाग हा प्रशासनाचा कणा असून, काळानुरूप वाढलेला कामाचा व्याप आणि लोकांच्या गरजा लक्षात घेऊन हा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. यामुळे प्रशासकीय कामात अधिक सुसूत्रता येईल, नवीन कार्यालयांमुळे जनतेला कामासाठी दूर जावे लागणार नाही आणि कामकाजात मोठी गती येईल. पारदर्शक आणि गतिमान प्रशासनासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल आहे, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

# सोलापुरात 'यश लॅक्मे सलून'चा भव्य शुभारंभ; आधुनिक सौंदर्य सेवांनी शहराला नवा ग्लॅमर टच!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर: ( प्रतिनिधी : नागेश श्रीचिप्पा ) सोलापूर शहरातील उद्योजक सुयश खानापुरे आणि सोनाली खानापुरे यांनी रिअल इस्टेट व बांधकाम क्षेत्रातील यशस्वी वाटचालीनंतर आता सौंदर्य क्षेत्रात दमदार एन्ट्री करत 'यश लॅक्मे सलून' या अत्याधुनिक उपक्रमाची शानदार सुरुवात केली आहे. यश आयकॉन रेल्वे लाईन, मोदी खाना परिसरात १ एप्रिल रोजी या सलूनचा भव्य शुभारंभ सुयश खानापुरे यांच्या मातोश्री गंगाबाई जनबसप्पा खानापुरे यांच्या शुभहस्ते उत्साहात पार पडला.

या उद्घाटन सोहळ्याला शहरातील राजकीय, सामाजिक, व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवरांची मोठी उपस्थिती लाभली. उद्योजक ब्रिजमोहन फोफलिया, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) राजन माने, आमदार विजयकुमार देशमुख, प्रमोद मोरे, डॉ. किरण देशमुख, संतोष पवार, पोलीस निरीक्षक शिवाजी राऊत, सुरज मुलानी, शिंगाडे, ठढज निरीक्षक संदीप शिंदे,मृगेंद्र चडचणकर, अक्कलकोटचे सौ.वनिता खेडगी यांच्यासह अनेक प्रतिष्ठित व्यक्तींनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

### ५ एप्रिलपासून सेवा सुरू

**हे अत्याधुनिक सलून येत्या ५ एप्रिलपासून नागरिकांसाठी खुले होणार असून, सोलापूरकरांनी या सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक सुयश खानापुरे व सोनाली खानापुरे यांनी केले आहे.**



**४० वर्षांची परंपरा, जागतिक दर्जाच्या सेवा–** "Lakmµ Salon' हा देशातील अग्रगण्य व विश्वासार्ह ब्युटी ब्रँड असून ४० वर्षांहून अधिक अनुभवासह देशभरातील १२५ हून अधिक शहरांमध्ये ४०० पेक्षा जास्त शाखांद्वारे सेवा देत आहे. हेअर कट, हेअर कलरिंग, स्किन केअर, फेशियल, ब्रायडल मेकअप आणि आधुनिक ग्रूमिंग सेवांसाठी हा ब्रँड विशेष ओळखला जातो.

**सोलापूरकरांसाठी अत्याधुनिक सुविधा –** 'यश लॅक्मे सलून'मध्ये प्रशिक्षित स्टायलिस्ट आणि ब्युटी एक्सपर्ट्सद्वारे जागतिक दर्जाच्या सेवा दिल्या जाणार आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञान, उच्च दर्जाची स्वच्छता आणि सुरक्षिततेचे काटेकोर पालन यामुळे ग्राहकांना दर्जेदार व विश्वासार्ह अनुभव मिळणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. महानगरांप्रमाणे आधुनिक सौंदर्य सेवा आता सोलापूरमध्येच उपलब्ध होत असल्याने शहराच्या विकासात आणखी एक नवे परिमाण जोडले जाणार आहे. या कार्यक्रमाला यश डेव्हलपर्सचे डायरेक्टर गुरुसिद्धप्पा हणमशेट्टी, बापूसाहेब पाटील, अजय फलमारी, मयूर दरगड, राहुल चंडक, धीरेंद्र हैदराबादवाले, रोहन बायस, रितेश बायस, सिद्धेश्वर खानापुरे, अक्षय वाकसे, अखिल हणमशेट्टी, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय....

### इच्छुकांची भाऊगर्दी

विधान परिषदेच्या रिक्त होणाऱ्या जागांवर संधी मिळावी, यासाठी भाजपमध्ये इच्छुकांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. यंदा १३ मे रोजी रिक्त होणाऱ्या ९ पैकी ४ जागा भाजपच्या वाट्याला येणार आहेत. अशावेळी राज्यसभा निवडणुकीत संधी न मिळालेल्या नेत्यांनी आता आपले संपूर्ण लक्ष विधान परिषदेवर केंद्रित केले असून उमेदवारीसाठी पक्षश्रेष्ठींकडे धाव घेतल्याचे समजते. विधान परिषदेच्या ९ सदस्यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपुष्टात येत आहे. या पार्श्वभूमीवर, एप्रिल महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. भाजपात असलेल्या इच्छुकांच्या लांबलचक यादीमुळे उमेदवारी कोणाला द्यायची, असा पेच पक्ष नेतृत्वासमोर निर्माण झाला आहे. भाजपचे रणजीतसिंह मोहिते-पाटील, संदीप जोशी, दादाराव केचे आणि संजय केणेकर या चार सदस्यांचा कार्यकाळ संपत आहे. पक्षाच्या धोरणानुसार यातील किती जणांना पुन्हा संधी मिळते आणि किती जणांचा पत्ता कट होतो, यावर अनेकांचे भवितव्य अवलंबून आहे. विशेषतः प्रादेशिक समतोल आणि जातीचे समीकरण पाहता पक्ष नव्या चेहऱ्यांना प्राधान्य देणार की जुन्यांनाच कायम ठेवणार, याची उत्सुकता वाढली आहे. पक्षासाठी वर्षानुवर्षे निष्ठेने काम करणाऱ्यांना संधी द्यायची की निवडणुकीतील गणिते पाहून नवीन उमेदवारांना मैदानात उतरवायचे, यावरून भाजपात सध्या खल सुरू आहे.

## भोंदूबाबा अशोक खरात याच्यावर कडक कारवाईची मागणी

**सामाजिक कार्यकर्त्यांचे निवेदन**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : नाशिक जिल्ह्यातील भोंदू बाबा अशोक खरात याने महिलांची फसवणूक करून त्यांचे लैंगिक शोषण केल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून अशा नराधमावर तात्काळ व कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी विविध सामाजिक संस्था व कार्यकर्त्यांच्या वतीने करण्यात आली आहे.



या संदर्भात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री मा. ना. देवेंद्रजी फडणवीस यांना नळदुर्ग पोलिस ठाण्याच्या प्रभारी आयपीएस मेघना आय. एन. यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, अशोक खरात या भोंदूबाबाने अंधश्रद्धा आणि धार्मिक भावनांचा गैरफायदा घेत महिलांना आपल्या जाळ्यात अडकवून त्यांचे मानसिक व लैंगिक शोषण केल्याची प्रकरणे समोर येत आहेत. अशा प्रकारामुळे समाजात भीतीचे व संतापाचे वातावरण निर्माण झाले असून महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. त्यामुळे अशा भोंदूबाबांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्गचे सचिव मारुती बनसोडे, ज्ञानकिरण सामाजिक संस्था अणदूरचे अध्यक्ष भैरवनाथ कानडे, पौर्णिमा महिला मंडळ अणदूरच्या अध्यक्षा बबई चव्हाण, दमयंती शिक्षण संस्था नळदुर्गच्या अध्यक्षा सौ. सुभद्राताई मुळे, अंबव्वा महिला मंडळ जळकोटच्या अध्यक्षा कस्तुराताई कारभारी, रेणुका महिला बचत गटाच्या कल्पना गायकवाड, तसेच सामाजिक कार्यकर्ते रेवणसिद्ध कारभारी आणि नागेश चव्हाण यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.सदर प्रकरणी प्रशासनाने ठोस पावले उचलण्याची अपेक्षा सामाजिक संस्था व नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## स्वर्गीय महादेव आवताडे यांच्या विसाव्या पुण्यतिथीनिमित्त कीर्तन सोहळ्याचे आयोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील आमदार समाधान आवताडे यांची वडील स्वर्गीय महादेव आवताडे यांच्या विसाव्या पुण्यतिथीनिमित्त भव्य कीर्तन सोहळा भजन आयोजन करण्यात आले होते यावेळी प्रथमेश पूजन माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी आमदार समाधान आवताडे, नगरसेवक डोके, सुभाष मस्के, प्रशांत देशमुख, आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नंदगाव येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी अध्यक्षपदी शाम नागिले तर उपाध्यक्षपदी विशाल मुकदान यांची निवड





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील नंदगाव येथे विश्वरत्न भारतीय संविधानाचे प्रमुख शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जंयत्ती निमीत्त संयोजन समिति गठीत करण्यात आली असून या जयंती उत्सव कमिटीच्या अध्यक्ष पदी शाम नागिले यांची तर उपाध्यक्ष पदी विशाल मुकदान यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी नंदगाव गावचे सरपंच शशिकांत नागिले हे होते तर ब्रह्मानंद माने व पंढरी सुरवसे यांच्या नेतृत्वाखाली या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे पुजन करून सामुदीयीक त्रिशरण पंचशिल घेण्यात आले.

यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त चार जनाची समिती गठीत करण्यात आली, यामध्ये अध्यक्ष शाम नागिले,उ पाध्यक्ष विशाल मुकदान, सचिव नागनाथ शिंदे,तर सहसचिव नितीन सुरवसे याची सर्वानुमत्ते निवड करण्यात आली. सदर बैठकीस भिमनगर व बौद्ध नगर मधील बौद्ध उपासक, युवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

सदर बैठक खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली असुन यावर्षी मंडळाने १४ एप्रिल ते ३ एप्रिल पर्यंत विविध कार्यक्रमाचे नियोजन करण्याचे ठरविले आहे.

नविन जयंती उत्सव समितीचे मंडळांच्या वतीने स्वागतपर सत्कार करण्यात आला .

या वेळी महादेव नागिले, रत्नाकर मुकदान, विनायक नागिले, बुद्धा नागिले, विठ्ठल वाघमारे, नागनाथ माने, बाबू माने, सुधाकर नागिले,संगमेश्वर बनसोडे, संजय नागिले, आदी भीम सैनिक उपस्थित होते.

## पंढरपूर शिवसेनेत अरुण भाऊ कोळी यांचा प्रवेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : १९८६ पंढरपूर तालुक्यात शिवसेनेच्या धनुष्यबान घरोघरी पोहोचवण्यासाठी पहिली शाखा काढलेले व पहिले तालुकाप्रमुख पदाची जबाबदारी पार पाडलेली अरुण भाऊ कोळी यांनी आता पुन्हा राज्याचे मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या हस्ते शिवसेनेचा भगवा पंचा धारण करीत शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश केला आहे. यावेळ शिंदे सेनेचे ओबीसी विभाग प्रदेशाध्यक्ष व मोहोळ नगरपालिकेचे प्रथम नगराध्यक्ष रमेश बारस्कर, व कोळी समाजाचे शिवसेनेला अरुण भाऊ कोळी हे कोळी महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष तसेच संस्थापक जय भवानी बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या माध्यमातून अनेक वर्षापासून समाजकारणात कार्यरत असून सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नासाठी सातत्याने पाठपुरावा करीत असल्याचे दिसून आली आहे तरी सर्वसामान्य जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी आक्रमक आंदोलन, मोर्चे, आणि उपोषणे करताना दिसून आले आहेत व सोलापूर जिल्ह्यात नव्हे तर राज्यात अनेक ठिकाणी त्यांचा मोठा जनसंपर्क असून महादेव कोळी समाजाच्या संघटना देखील त्यांचा मोठा वाटा राहिला आहे.





अरुण भाऊ कोळी यांनी शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर मंत्री भरत शेठ गोवा यांनी आमचा जुना कट्टर शिवसैनिक पुन्हा आमच्याकडे परत आला याचा मोठा आनंद होत असल्याचे भावना व्यक्त केली आहे. तर शिवसेनेच्या माध्यमातून आपण सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नासाठी संघर्ष करू व पक्षप्रमुख महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांनी सामान्य जनतेच्या हितासाठी घेतलेले अनेक निर्णय व योजना जनतेपर्यंत पोहोचवण्याची ग्वाही घेऊ अशी आणून भाऊ कोळी यांनी व्यक्त केली,

**आंदोलनास न्याय मिळत नसल्याने मा.राज्यपाल यांना दिले निवेदन**

# कळंब तालुक्यातील डिकसळ येथील अवैध उत्खनन प्रकरणी सचिन वाघमारे यांचे कुटुंबासह मंत्रालयासमोर उपोषण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब /प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील मौजे डिकसळ येथील अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणी डिकसळ येथील सचिन वाघमारे हे मंत्रालयासमोर कुटुंबासह उपोषणाला बसले आहेत. उपोषण करुन ही सदरील मागण्या मान्य होत नसल्याने महामहिम राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, राजभवन मुंबई यांना सचिन सटवा वाघमारे व पत्नी सौ रमा सचिन वाघमारे, या दोघांनी निवेदन दिले आहे. दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, डिकसळ ता.कळंब येथील अवैध गौण खनिज( मुरूम ) उत्खननामुळे नुकसान भरपाई मिळण्यासाठी मंत्रालयासमोर कुटुंबासह बेमुदत आंदोलन चालू असुन धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुका महसूल प्रशासनातील तत्कालीन अधिकाऱ्यांच्या अनियंत्रण चा आर्थिक फायदा होण्याच्या हेतू पुरस्कार उद्देशाने पर्यावरणाचे कसूरपणा, अधिकार व पदाचा दुरुपयोग करून ज्ञात उत्पन्नापेक्षा अतिरिक्त अवैध आर्थिक कमाई केलेली आहे.




### डिकसळ ता.कळंब येथील अवैध गौण खनिज (मुरूम) उत्खननामुळे नुकसान भरपाई मिळण्यासाठी आंदोलन

- **तत्कालीन अधिकाऱ्यांच्या अनियंत्रण आणि निष्काळजीपणामुळे शेती आणि सिंचन विहिरीचे नुकसान**
- **राज्य शासनाचा कोट्यावधी रुपयांची महसुलाची प्रचंड मोठी आर्थिक बुडवणूक**
- **दोषी अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे नोंद करण्याची मागणी वाघमारे यांची मागणी..**

निष्काळजीपणा मुळे माझे शेती व सिंचन विहिरीचे पडझड होऊन मोठे व्यक्तिगत नुकसान केलेले आहे. तसेच, संबंधितांनी मे. राज्य शासनाचा कोट्यावधी रुपयांची महसुलाची प्रचंड मोठी आर्थिक बुडवणूक केली आहे. स्वतः शासकीय कर्तव्यात अक्षम्य परवानगी न घेता दलालांना हाताशी धरून बेसुमार मुरमाचे अवैध उत्खनन त्या ठिकाणी केलेले असून दस्तुरखुद्द., तत्कालीन दोषी( ०४) तहसीलदारांसह इतर(०६) महसूल कर्मचाऱ्यांनी एवढा मोठा अति गंभीर गुन्ह्याचा ( महाराष्ट्र संघटित गुन्ह्यासारखा ) प्रकार निष्पन्न होऊन देखील संबंधितांवर फौजदारी गुन्हे नोंद करण्यासाठी मी जिल्हा/ शासनस्तरावर आझाद मैदान मुंबई. मंत्रालयसमोर दि.२३ मार्च २०२६ रोजी पासून कुटुंबासह व दोन लहान बालकांसह हे बेमुदत आंदोलन सुरू केलेले आहे. तसेच माझ्या जगण्याचे / कमाईच्या साधनाचे नुकसान झाल्यामुळे जगणे असह्य होत आहे. त्यामुळे आम्हास मेहरबान, मायबाप सरकारने आमची मागणी मान्य करावी. अन्यथा..! आम्हास सामूहिकपणे विष-प्राशन करण्यासाठी अधिकृत मान्यता द्यावी. असे, निवेदनात म्हटले आहे. तसेच सनदशीर/लोकशाही मार्गाने चालू केलेले माझ्या बेमुदत आंदोलनास अद्यापपर्यंत मे.शासनाने माझ्या अर्जातील मुद्द्यांच्या अनुषंगाने कोणतेही संवेदनशिलतेने तसेच सहानुभूतीने दखल घेतलेली नाही. केवळ महसूल विभागातील मे.उपसचिवांनी / कक्ष अधिकाऱ्यांनी दि.२५ मार्च २०२६ रोजी पत्रकाद्वारे मा. जिल्हाधिकारी धाराशिव यांना चौकशी करून नियमानुसार फक्त शिस्तभंगाची कारवाई करण्याचे सुचविले आहे. तरी माझ्या विनंती केलेल्या निवेदनाची तात्काळ दखल घेऊन प्रत्यक्ष फौजदारी कार्यवाही करून वसुलीचे आदेश मे. राज्य शासनास करावेत अशी मागणी सचिन वाघमारे यांनी निवेदनात केली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# नागरिकांनी गॅस एजन्सी समोर ई केवायसी व बुकिंग ची माहिती घेण्यासाठी रांगा लावू नयेत : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

## नागरिकांनी ई केवायसी घरी बसून ॲप द्वारे ऑनलाईन करण्याचे आवाहन; गॅस सिलेंडरची डिलिव्हरी झाली त्या दिवसापासून शहरी भागात एक गॅस धारक २५ दिवसात तर डबल गॅस धारक ३५ दिवसात आणि ग्रामीण भागात ४५ दिवसात गॅस सिलेंडरचा पुरवठा

**■ गॅस एजन्सी समोर गर्दी होऊ नये यासाठी कंपन्याकडून गॅस एजन्सींना वाढीव गॅस सिलेंडर पुरवठा करण्यात येणार आहे**

**■ नागरिकांनी अफवावर विश्वास ठेवू नये, जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल व एलपीजीचा तुटवडा नाही**

**■ अन्नधान्य वितरण कार्यालयाच्या ०२१७-२७३११००८ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क करावा**




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर शहरात बीपीसीएल, आयओसीएल व एच-पीसीएल या तीन गॅस कंपनीच्या एकूण २० गॅस एजन्सी कार्यरत आ-हेत. यातील सात गॅस एजन्सी समोर नागरिक ई केवायसी साठी तसेच गॅस सिलेंडर साठी मोठ्या प्रमाणावर गर्दी करत असल्याचे निर्देशनास आले आहे. तरी नागरिकांनी घरी बसून क्यू आर कोडच्या माध्यमातून ई केवायसी करावे व तर गॅस कंपन्यांनी गर्दी होणाऱ्या गॅस एजन्सींना वाढीव गॅस सिलेंडर पुरवठा करून त्या एजन्सीनी गॅस सिलेंडरचा पुरवठा घरपोच करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

नियोजन भवन येथील सभागृहात गॅस पुरवठा करणाऱ्या कंपन्यांच्या तसेच गर्दी होणारा शहरातील सात गॅस एजन्सी प्रतिनिधी यांच्या समवेत आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, गॅस कंपनीचे जिल्हा सम न्वयक श्री. रघुकुमार, एचपीसीएलचे सागर चव्हाण व आयओसीएलचे सागर गौतम यांच्यासह गॅस एजन्सी चे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले की, जिल्ह्यातील गॅस एजन्सी समोर गर्दी होऊ नये यासाठी प्रशासनाने २३ मार्च रोजी स्पष्ट आदेश दिले आ-हेत. तरी सोलापूर शहरातील काही ठिकाणी गॅस एजन्सी समोर सिलेंडर साठी रांगा लागत आहेत. तसेच एजन्सीच्या म्हणण्याप्रमाणे ई केवायसी साठी नागरिक मोठ्या प्रमाणावर येत असल्याने ई केवायसी साठी प्रशासनाच्या वतीने क्यूआर कोड उपलब्ध करून देण्यात येत आहे. नागरिकांनी घरी बसूनच ऑनलाइन ई-केवायसी करण्याचे आव-ाहन त्यांनी केले.

सोलापूर जिल्ह्याच्या एलपीजी गॅस पुरवठा म ध्ये बदल झालेला नाही, परंतु पॅनिक बुकिंग मुळे गॅस सिलेंडरच्या मागणीत अडीच पट वाढ झालेली आहे. त्यामुळे सिलेंडरचा पुरवठा करण्यात वेळ लागत आहे. पॅनिक बुकिंग कमी झाल्यानंतर लोकांना गॅस सिलेंडर वेळेत मिळणार आहे. सोलापूर शहर व जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या अफवावर विश्वास ठेवू नये. व गरज नसताना बुकिंग करू नये. सोलापूर जिल्ह्यासाठी पेट्रोल, डिझेल व एलप-ीजी चा मागणीप्रमाणे साठा उपलब्ध होत आहे. गॅस एजन्सी समोर सिलेंडर साठी येऊ नये, ऑनलाइन बुकिंग करावे व घरपोच सिलिंडर उपलब्ध करून घ्यावा. ज्या गॅस एजन्सी ना गॅस सिलेंडरचा अतिरिक्त साठा आवश्यक असेल त्यांनी तशी मागणी नोंदवावी व मिळालेला साठा हात ऑनलाइन बुकिंग केलेल्या ग्राहकांनाच घरपोच पोहोचवण्याचे योग्य नियोजन करावे. त्यासाठी अतिरिक्त वाहने व डिलिव्हरी बॉय उपलब्ध करून घ्यावेत, असेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी निर्दे शित केले.

गॅस एजन्सीमध्ये ई केवायसी करण्यासाठी तसेच बुकिंग ची माहिती विचारण्यासाठी ग्राहकांची गर्दी होत असल्याने जिल्हा प्रशासनाकडून ग्राहकांसाठी तक्रार निवारण केंद्र उभारले जात असून यासाठी पुरवठा विभागाचे तीन कर्मचारी तसेच एचप-ीसीएल बीपीसीएल व आयओसीएल या कंपनीचा एक एक प्रतिनिधी नियुक्त करण्यात येत आहे. या कर्मचाऱ्यांनी त्यांच्याकडे गॅस सिलेंडरच्या अनुषंगाने आलेल्या तक्रारी विषयी त्यांचे निव-ारण करून समाधान करणे अपेक्षित असल्याचे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

गॅस कंपनीचे जिल्हा समन्वयक श्री. रघुकुमार यांनी तिन्ही कंपन्यांच्या वतीने गॅस सिलेंडरची वाढीव मागणी असलेल्या गॅस एजन्सींना पुरवठा करण्यात येईल असे सांगितले. तसेच ग्राहक तक्रार निवारण केंद्रासाठी एक एक कर्मचारी उपलब्ध करून देण्यात येईल असेही त्यांनी म्हटले.

प्रारंभी अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांनी सोलापूर शहरातील गॅस एजन्सी ची माहिती देऊन यातील सात गॅस एजन्सी समोर नागरिक मोठ्या प्रमाणावर रांगा लावत असल्याचे सांगितले.

**सोलापूर शहरातील LPG ग्राहकांचे ekyc करणे प्रक्रिया व घरपोच सिलेंडर पुरवठा करण्याबाबत सूचना**

■ आपण सोलापूर शहरातील अधिकृत एलपीजी ग्राहक आहात

■ कृपया आपले गॅस कनेक्शन सुरू ठेवण्यासाठी शझूल करण्याबाबत आपण संबंधित सरी एजन्सी मध्ये न जाता मोबाईल द्वारे ekyc ची प्रक्रिया पूर्ण करता येईल. त्यासाठीचा क्यूआर कोड प्रशासनाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात येत आहे.

■ सर्वप्रथम आपण खालीलप्रम ाणे ऍप श्रिू स्टोर मधून डाउनलोड करावे

१.IOCL कंपनीचे जी ग्राहक असल्यास Indane Oil ONE हे ऍप डाउनलोड करावे

२.BPCL कंपनीचे ग्राहक असल्यास BPCL For Business हे ऍप download करावे

३.HPCL कंपनीचे ग्राहक असल्यास HP PAY हे ऍप वुेपश्रेरव करावे.

वरील ऍप मध्ये माहिती भरून Adhaar Face RD या ap-pvarun प्रमाणित करून आपले शझूल त्वरित पूर्ण करून घ्यावे.

तसेच आपली गॅस बुकिंग झाली असल्यास आपल्याला विहित वेळेत घरपोच गॅस सिलेंडर पुरवठा होणार असल्यामुळे कृपया गॅस एजन्सी समोर रांगेत उभे राहू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासन यांच्याकडून करण्यात येत आहे.

# दि पंढरपूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेने NPA 0 राखण्यास अग्रेसर : चेअरमन अमरजीत पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर या ठिकाणी असलेल्या व्यापारी बँक म्हणून ओळखली जाण-ारी नदी पंढरपूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक पंढरपूर या व्यापारी बँकेच्या विविध ठिकाणी शाखा असून प्रधान कार्यालय पंढरपूर या ठिकाणी असून या व्यापारी बँकेच्या वार्षिक अहवालामध्ये सात कोटी ७० लाख १२ हजार रुपयांचा बँकेला नफा झाला असून दीप पंढरपूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक ही संपूर्ण सोल-ापूर जिल्ह्यामध्ये आदर्श बँक पुरस्कार प्राप्त अशी बँक म्हणून ओळखली जाते ती पंढरपूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेने एनपीए शून्य टक्के राखण्यामध्ये अग्रेसर ठरल्याची माहिती चेअरमन अमरजीत पाटील यांनी आज रोजी दिली.

बँकेचा शून्य टक्के राखण्यासाठी बँकेचे सर्व सभासद कर्जदार ग्राहक आणि कर्मचारी वर्ग यांनी अथक प्रयत्न केलेली आहेत या सर्वांच्या सहकार्यामुळे आज ती पंढरपूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक ही प्रगतीपथाकडे वाटचाल करीत असल्याची माहिती देखील चेअरमन अमरजीत पाटील यांनी दिली.

# अक्कलकोट येथे हनुमान जयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : तीर्थक्षेत्र अक्कलकोट शहर व परिसरात गुरुवारी सकाळी महापूजा, लघुरुद्र, महाभिषेक, महाप्रसाद अशा धार्मिक कार्यक्रमांसोबत भजन अशा विविध धार्मिक कार्यक्रमांनी हनुमान जयंती उत्स-ाहात साजरी करण्यात आली. हनुमान मंदिर परिसरात भाविकांची भल्या सकाळपासूनच गर्दी झाली होती, तर ठिकठिकाणच्या हनुमान मंदिरातही भक्तजनांची रीघ लागली होती.

हनुमान जयंतीनिमित्त बहुतांश मंदिरे आकर्षक रोषणाईने सजविण्यात आली. यानिमित्त हनुमान मूर्तीची विधिवत पूजा व हनुमान याग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.शहरातील दिशा विहार येथील श्री वटवृक्ष दक्षिण मुखी हनुमान मंदिरात वेदमूर्ती गुड्य्या स्वामी यांच्या विविध मंत्रोप्चाराने हनुमान जन्म सोहळा( पाळणा), लघुरुद्र, भजन सेवा आदींचा समावेश होता. पाळ-णा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्योती शिंदे, राजश्री,अलका दसले, वैष्णवी,उज्ज्वला गुरव, चंद्रकला हत्ते, विजयालक्ष्मी कुंभार, नेत्रावती डिग्गे श्रीद-ेवी गुरव, कलावती रोळी, रुप-ाली कोरे, आरती आळंद, अनिता कुंभार, पूजा स्वामी, उगाडे, चंदा कुंभार आदींनी परिश्रम घेतले.

शहरातील दिशा विहार येथील श्री वटवृक्ष दक्षिण मुखी हनुमान मंदिराला आकर्षक विद्युत



रोषणाईने सजविण्यात आले. या मंडळातर्फे हनुमान जन्मोत्सव सो-हळा पार पडला. श्री वटवृक्ष हनुम ान मंदिरात महाप्रसाद कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रमुख रमेश शिंदे,चंद्रकांत दसले, दिगंबर साळुंखे, नागराज कुंभार, वेदेश गुरव, माजी सैनिक अनिल हत्ते, सचिन डिग्गे, बसवराज आगरखेड, अविनाश कोरे, जयंत शिंदे, गुरप्पा कुंभार, सचिन जरिपटके, आदींनी परिश्रम घेतले.

## सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांच्या हस्ते 'माझं गाव,आरोग्य संपन्न गाव' विभागीय कार्यशाळेचे उद्घाटन

# लोकसहभागातून आरोग्य समृद्ध महाराष्ट्रासाठी ; गाव आरोग्य संपन्न करण्यावर भर द्यावा : सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**गुणवत्तापूर्ण कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना आरोग्य संपन्न ग्राम म्हणून मानांकन-सार्वजनिक आरोग्य मंत्री**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव हे केवळ अभियान नसून ती एक व्यापक लोकचळवळ बनावी आणि लोकसहभागातून राज्यभर आरोग्याचा जागर व्हावा हेच या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या अभियानात उपचारांपेक्षा प्रतिबंधात्म क उपाययोजनांवर भर देणे, ग्रामीण भागातील नागरिकांच्या सामुहिक वर्तणुकीत बदल घडविणे आणि आरोग्यदायी जीवनशैली रुजविण्यावर या मोहिमेत भर देण्यात आल्यामुळे लोकसहभागाच्या माध्यमातून आरोग्य संपन्न गाव करण्यावर भर द्यावा, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबीटकर यांनी केले.

या अभियानामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा व तालुका यंत्रणा, प्राथमिक आरोग्य केंद्रे, आरोग्य उपकेंद्रे व या ठिकाणी कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्यसेवक, सेविका व आशा तसेच ग्रामस्थांचा सक्रीय सहभाग महत्वपूर्ण ठरणार आहे. एकात्मिक कार्यप्रणाली व पारदर्शक मूल्यांकन प्रणालीच्या आधारे, या अभियानातून गुणवत्तापूर्ण कामगिरी करणाऱ्या ग्राम पंचायतींना आरोग्य संपन्न ग्राम म्हणून मानांकन व प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात येणार आहे, आरोग्य समृद्ध म हाराष्ट्र घडविण्यासोबतच हे अभियान यशस्वी करण्यासाठी उत्स्फूर्तपणे पुढे यावे, असेही श्री. आबिटकर म्हणाले.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने जिल्हास्तरीय पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकरिता श्रीमती काशीबाई नवले वैद्यकीय महाविद्यालय, साम ान्य रुग्णालय येथे आयोजित 'माझं गाव,आरोग्य संपन्न गाव' विभागीय कार्यशाळाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष मधुकर पाटील, आरोग्य विभागाचे प्रधान डॉ. निपुण विनायक, सचिव ई. रविंद्रन, शहरी आयुक्त डॉ. सु-नील भोकरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कंदेवाड, सिंहगड इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मारुती नवले आदी उपस्थित होते.

श्री. आबीटकर म्हणाले, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली १० फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत 'म ाझं गाव,आरोग्य संपन्न गाव' अभियान राबविण्याचा आणि त्याला आवश्यक ती निधीची तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला. 'माझं गाव,आरोग्य संपन्न गाव' अभियानाला आज पा-सून सुरुवात करण्यात आली, या अभियानात ग्रामीण भागाचा चे-हरा-मोहरा बदलण्यासोबतच लोकसहभागाच्या माध्यमाचा आरोग्याचा जागर करण्यात येणार आहे. हे एक शासकीय अभियान न राहता यामध्ये अधिकाधिक लोकसहभाग घेत व्यापक आरोग्य चळवळ निर्माण करण्याचा प्रयत्न करुया.

ग्रामीण महाराष्ट्राच्या आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासोबतच निरोगी जीवनशैलीच्या दृष्टीकोनातून नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी पुढाकार घ्यावा. अभियान यशस्वी करण्यासाठी विविध घटकांसोबत चर्चा करावी, त्यांच्या सूचनांचा स्वीकार करुन समन्वयाने काम करावे, आगामी काळात त्याप्रम ाणे आवश्यक ते बदल करण्यात येतील.

राज्यातील एकही नागरिक आरोग्य योजनांपासून वंचित राहू नये, यासाठी सर्वांनी कटिबद्धतेने काम करावे. हे अभियान आपल्या नागरिकांच्या आरोग्यदायी भविष्यासाठी राबविण्यात येत असून, ती चळवळ म्हणून यशस्वी करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. या अभियानाच्या यशासाठी आरोग्य विभागामार्फत आवश्यक सहकार्य करण्यात येईल.

राज्याच्या आरोग्य विभागाच्या माध्यातून नागरिकांना मोफत आरोग्य सेवा देण्यात येत आहे. गावपातळीपर्यंत आरोग्य सुविधा बळकटीकरणावर भर देण्यात आले. विभागामार्फत एकात्मिक आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांसारख्या राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती तळागळापर्यंत पोहोचवून नागरिकांना आरोग्य सुविधा दिल्या देण्याचे काम करावे. योजना यशस्वी करण्याकरिता लोकसहभागाची चळवळ म्हणून पुढे आले पाहिजे.

नवीन पिढीच्या सुरक्षिततेसाठी आणि कर्करोगासारख्या आजाराला रोखण्याकरिता राज्यातील १४ वर्षे वयोगटातील ९ लाख ८४ हजार मुलींचे (ज्यांनी चौदावा वाढदिवस साजरा केला आहे परंतु पंधरावा वाढदिवस अद्याप झालेला नाही) मोफत लसीकरण करण्याचा कार्यक्रम सुरु आहे. या लसीकरणाबाबत व्यापक स्वरुपात जनजागृती करावी. शिबीराला भेटी देवून माहिती घ्यावी, असे आवाहन श्री. आबीटकर म्हणाले.

श्री. जगदाळे म्हणाले, पुणे जिल्ह्यात 'मॉडेल पीएचसी'च्या माध्यमातून चांगली आरोग्य सेवा देण्याची सुरुवात करण्यात आली आहे. त्यासाठी ग्रामीण स्तरावर रुग्ण कल्याण समितीची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. या समित्या पुन्हा कार्यान्वित कराव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

डॉ. विनायक यांनी 'म ाझं गाव,आरोग्य संपन्न गाव' अभियानाविषयी माहिती देवून ते पुढे म्हणाले, आरोग्य ही केवळ वैयक्तिक बाब नव्हे तर सार्वजनिक बाब आहे, त्यामुळे आरोग्य विभागामार्फत आरोग्य विषयाला केंद्रबिंदू मानून विविध आरोग्य विषय योजना मोहिम स्वरुपात राबविण्यात येत आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्य विषयक सम स्या सोडविण्याकरिता तळागळापर्यंत पोहोचवून काम करावे, येत्या काळात हे अभियान शहरी भागात राबविण्यात येईल, असेही डॉ. विनायक म्हणाले.

श्री. पाटील म्हणाले, ग्रामीण भागात आरोग्य विषयावर व्यापक स्वरुपात जनजागृतीची आवश्यकता आहे. अभियानाची अंमलबजावणी, नियोजन आणि विविध स्तरांवरील जबाबदाऱ्या याबाबत विस्तृत म ार्गदर्शन केले.

यावेळी श्री.आबीटकर यांच्या हस्ते 'माझं गाव,अ ारोग्य संपन्न गाव' अभियान संदर्भात माहिती पुस्तिकेचे तसेच गीताचे अनावरण करण्यात आले. तसेच अभियानाच्या जनजागृतीकरिता चित्ररथाचा फित कापून शुभारंभ करण्यात आला. यावेळी कार्यशाळेत अभियान अंम लबजावणीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पूर्वतयारीबाबत संबंधित जिल्हा प्रतिनिधींनी माहिती दिली.

या कार्यशाळेत पुणे विभागातील सर्व परिमंडळातील उपसंचालक, जिल्हा आरोग्य शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने या कार्यशाळेला उपस्थित होते. तसेच मुंबई, ठाणे, पाल-घर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा, सांगली जिल्ह्या-तील आरोग्य विभागाचे पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी सहभागी होते.

# गॅस आणि इंधनचा पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या आमदार समाधान आवताडे यांच्या सूचना

## आमदार आवताडे यांनी साधला गॅस एजन्सी प्रतिनिधी, पेट्रोल पंप चालक आणि प्रशासना बरोबर संयुक्तसंवाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : पंढरपूर- मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात गॅस आणि इंधनचा सुरळीत पुरवठा सुरू ठेवण्यासाठी आमदार समाधान आवताडे यांनी गुरुवारी पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील प्रांत अधिकारी व दोन्ही तालुक्यातील तहसीलदार, गॅस एजन्सीचे प्रतिनिधी आणि पेट्रोल पंप चालक यांची मंगळवेढा येथे बैठक घेतली.



याप्रसंगी आमदार समाधान आवताडे यांनी मतदारसंघात गॅस आणि इंधनचा पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या सूचना दिल्या. याप्रसंगी पंढरपूरचे प्रांत अधिकारी सचिन इथापे, मंगळवेढ्याचे बी, आर, माळी, पंढरपूरचे तहसीलदार सचिन लंगोटे, मंगळवेढ्याचे तहसीलदार मदन जाधव, सभापती दिपाली ताड, जिल्हा परिषद सदस्य रमेश भांजे, जिल्हा परिषद सदस्य प्रदीप खांडेकर , उपनगराध्यक्ष येताळा भगत,जिल्हा परिषद सदस्य करुणा शिवशरण,अनिल नागटिळक , अरुण नागटिळक यांच्यासह गॅस एजन्सीचे प्रतिनिधी तसेच पेट्रोल पंप चालक उपस्थित होते.

आखाती देशात सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे देशाबरोबर राज्यातही गॅस आणि इंधनचा तुटवडा भासू लागल्याने सर्वसामान्य नागरिकांना समस्यांशी सामना करावा लागत असून हॉटेल व्यावसायिकांवर व्यवसाय बंद करण्याची वेळ आली आहे.

देवभूमी पंढरपूर आणि संत भूमी मंगळवेढा येथे मोठ्या संख्येने भाविक दाखल होत असतात येथे येणाऱ्या भाविकांची संख्या पाहता हॉटेल व्यवसायिकांना आणि स्थानिक नागरिकांना गॅस आणि इंधनचा सुरळीत पुरवठा व्हावा. यासाठी गुरुवारी आमदार समाधान आवताडे यांनी मंगळवेढा येथे पंढरपूर आणि मंगळवेढा या दोन्ही तालुक्यातील तहसीलदार, गॅस एजन्सीचे प्रतिनिधी आणि पेट्रोल पंप चालकांची बैठक घेऊन मतदार संघात गॅस आणि इंधनचा पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या सूचना केल्याने सर्वसामान्य नागरिकांना आणि हॉटेल व्यवसायिकांना दिलासा मिळणार आहे.

# जवळगा (मेसाई ) येथे विज कोरुळून दोन म्हशी व एका बैलाचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील जवळगा (मेसाई ) येथील शेत शिवारातअसलेल्या सुभाष दामू मस्के यांच्या शेतात मंगळवार दि.०१ एप्रिल २०२६ रोजी रात्री ११. वा. सुमारास वादळी वारा व विजेच्या कडकडाटासह



झालेल्या अवकाळी पावसामुळे वीज कोसळून झाडाखाली बांधलेल्या दोन म्हशी व एका बैलाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली असून अवघ्या पन्नास ते साठ फूट अंतरावर वास्तव्यास राहत असलेले मस्के कुंदब सुदैवाने वाचल्याने मनूष्यहानी होण्याचा मोठा अनर्थ ठळला आहे.

जवळगा (मेसाई) येथील सुभाष दामू मस्के हे आपल्या कुटुंबासह मालकी हक्काच्या शेतात राहतात. शेती व्यवसायावरच त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो.शेतीला जोड धंदा म्हणून त्यांनी दोन म्हशी पाळलेल्या होत्या.म्हशीच्या दुधापासून थोडी फार आर्थिक मदत त्याना मिळत होती.त्याचंबरोबर त्यांनी एक बैल ही पाळला होता.बघत बघत आर्थिक तरतूद करून दुसरा बैल खरेदी करून बैल जोडीच्या माध्यमातून शेतीची मशागत करून शेती व्यवसाय सुधारण्याचे त्यांचे स्वप्न होते. परंतु त्यांच्या या स्वप्नावर निसर्गाचा कोप झाला.

दि.०१ एप्रिल २२६ रोजी रात्री ठीक ११.०० वाजण्याच्या दरम्यान अचानक वादळी वारा विजेच्या कडकडाट सह पाऊस सुरू झाला. या वेळी लिंबाच्या झाडावर विज कोसळली आणि लिंबाच्या झाडाखाली बांधलेल्या दोन म्हशी व एक बैल जागीच मृत्यू पावले. या ठिकाणाहून अवघ्या पन्नास ते सात फुट अंतरावर ते वास्तव्य करत असलेल्या घरास विजेची झळ पोचली नाही. त्यामुळे एक मोठी मनुष्य हानी होण्याचा अनर्थ टाळला.या घटनास्थळाला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे धाराशिव जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब मस्के व ग्रामस्थांनी भेट देऊन पाहणी करून सुभाष मस्के याना मानसिक आधार देवून शासनाने सदर घटनेची नोंद घेऊन रीतसर पंचनामा करून नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान पावलेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्याला तात्काळ आर्थिक मदत द्यावी अशी मागणी रिपाइं (आठवले) चे धाराशिव जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब मस्के सह ग्राम स्थांनी केली आहे.

सदर दुर्दैवी घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# पंढरपूर नगर पालिकेची आर्थिक स्थिती, उत्पन्न वाढीचे पर्याय, आणि निळ्या पोरीची समस्या, नगरसेवक संजय बनपट्टे यांनी पहिल्या संरक्षण सभेत प्रशासनाचे लक्ष वेधले



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरपालिकेची २० मार्च रोजी सकाळी अकरा वाजता छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये घेण्यात आली. पहिल्याच सर्वसाधारण सभेत पंढरपुरातील मंदिर परिसरातील प्रस्तावित कॉरिडॉर उशिरातील अनेक महत्त्वपूर्ण विकास कामावर चर्चा झाल्याची दिसून आले पंढरपूर नगरपालिकेकडे शहरातील विविध ठेकेदार तसेच पूर्वदार यांचे नगरपालिकेकडे ४१ कोटी रुपयांची बिले थकीत असल्याचे बाब स्पष्ट झाल्याने पुढील विकास कामासाठी निधीची उपलब्धता लक्षात घेत नियोजन करावे लागणार आहे. नगरसेवकांना आपल्या प्रभागातील विकास कामे करताना मर्यादा पडणार आहेत आणि यातूनच सर्वसाधारण सभेत विकास कामे करताना जी कामे अत्यावश्यक आहेत आणि तातडीने करणे गरजेचे आहे अशा कामांना प्राधान्य दिले जावे अशी मागणी तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे नगरसेवक संजय बंदपट्टे यांनी सभागृहात केल्याचे दिसून आले.

पंढरपूर नगरपालिकेकडून आपले आर्थिक उत्पन्न वाढवण्यासाठी काय उपाययोजना केल्या जाणार आहेत असा प्रश्न देखील नगरसेवक संजय बंदपट्टे यांनी उपस्थित केला.

पंढरपूर नगरपालिकेकडून शहरात येणाऱ्या वाहनांना आकारल्या जाणाऱ्या या पार्किंगच्या निविदा रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे अधिकृत रित्या पार्किंगची वसुली बंद आहे परंतु शहराच्या अनेक भागात बोगस पावत्या देऊन तसेच बेकायने वसुली करण्याचा आरोप नगरसेवक संजय बंदपट्टे यांनी केला आहे जर अशा पद्धतीने जर खाजगी व्यक्ती परस्पर वसूल करत असेल तर पंढरपूर नगरपालिकेने येणाऱ्या भाविकांना कुठलाही त्रास होणार नाही. पार्किंग पी कशा पद्धतीने आकाराला जाईल यासाठी उपाययोजना करून निविदा प्रक्रिया राबवावी असा प्रश्न देखील नगरसेवक संजय बंदपट्टे यांनी उपस्थित केला.

पंढरपूर नगरपालिकेकडून शहरात येणाऱ्या वाहनांना आकारल्या जाणाऱ्या पार्किंगची निविदा रद्द करण्यात आली आहे त्यामुळे अधिकृतरित्या पार्किंगची वसुली बंद आहे. पालिकेच्या मालकीच्या शहरात अनेक मोक्याच्या ठिकाणी जागा आहेत करारभंग केलेल्या अथवा करार संपलेल्या अशा जागा ताब्यात घेऊन त्या ठिकाणी शॉपिंग सेंटर उभारले जावे त्यामुळे नगरपालिकेचे उत्पन्न वाढेल यासाठी उत्पन्न करावेत अशी मागणी यावेळी नगरसेवक संजय बनपट्टे यांनी केली या सर्वसाधारण सभेत पंढरपूर शहराचा मोठा भाग चंद्रभागा नदीच्या निळ्या फोडणीचे समाविष्ट करण्यात आलेला आहे त्या ठिकाणच्या रहिवाशांना नगरपालिकेकडून बांधकाम परवाने मिळवण्यात मोठी अडचण येत आहे तरी राज्य शासनाकडे याबाबत तुरीत पाठपुरावा केला जावा अशी मागणी नगरसेवक संजय बंदपट्टे यांनी केलेले दिसून येत आहे.

# रक्तदानातून पवनपुत्रास वंदन, गीतगंगा सोशल फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : रक्ताला जात, धर्म किंवा पंथ नसतो; तो केवळ माणुसकीचा रंग असतो. विज्ञानाने मोठी प्रगती साधली असली तरी आजही प्रयोगशाळेत रक्ताचा एक थेंब कृत्रिमरीत्या तयार करता आलेला नाही. त्यामुळे रक्तदानाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. रक्तदानामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात. जिथे भक्ती असते, तिथे शक्ती असते आणि या शक्तीचा उपयोग माणुसकीच्या सेवेसाठी व्हावा, यासाठी प्रत्येकाने स्वयंस्फूर्तीने रक्तदान करावे, असे आवाहन सुप्रसिद्ध सरकारी वकील तथा सीबीआय कौन्सिल ड. प्रदीपसिंह राजपूत यांनी केले.



ते गीतगंगा सोशल फाउंडेशनच्या वतीने श्री. हनुमान जयंतीचे औचित्य साधून आयोजित रक्तदान शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी गीतगंगा सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष व्यंकटेश कंची, सोलापूर महानगरपालिका स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, विद्यमान नगरसेवक ज्ञानेश्वर म्याकल, राजकुमार पाटील, प्रथमेश कोटे, माजी नगरसेवक सुरेश पाटील, अशोक संकलेचा, चंद्रकांत कंची, नितीन शेजुळ, चन्नेश इंडी, रवी कोटा, विनायक मादम, चंद्रकांत जक्कन, राज कनकी, सचिन जाधव, रत्नाकर नक्का, सागर अतनुरे, पप्पू क्षीरसागर, सतीश सिरसुला, दत्तात्रय बडगु, फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, आकाश गायकवाड, संतोष गडगडे, कल्पना गडगडे, सुनीता पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. हेडगेवार रक्तपेढीच्या वतीने रक्तसंकलन करण्यात आले. यावेळी २५ भाविकांनी रक्तदान करून माणुसकीचा जागर केला.

कार्यक्रमाचे स्वागत चंद्रकांत कंची यांनी केले, प्रास्ताविक व्यंकटेश कंची यांनी मांडले. सूत्रसंचालन स्वयंम कंची यांनी केले, तर आभार वेणूगोपाल उत्तूर यांनी केले.

# डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १३५ व्या जयंतीनिमित्त* विवेक विचार मंच आणि भीम प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमानाने चित्रकला आणि निबंध स्पर्धा चे आयोजन , सम्राट चौक येथील कर्मवीर भाऊराव पाटील रयत शिक्षण अंतर्गत रावजी सखाराम हायस्कूल सोलापूर येथे घेण्यात आले.



याप्रसंगी विवेक विचार मंचच्या जिल्हा संयोजिका आश्विनी ताई चव्हाण, कार्यक्रम प्रमुख प्रीतीताई उडाणशिव , भीम प्रतिष्ठानचे संस्थापक दलितमित्र बाबा बाबरे , सचिव अकबर शेख, यश उडानशिव, विवेक विचार मंचचे शहर संयोजक सिद्धांत बाबरे आणि रावजी सखाराम हायस्कूल चे सर्व शिक्षक स्टाफ उपस्थित होते. या निबंध स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विषय म्हणून महापुरुषांच्या जीवन चरित्र त्यांचे कार्य असे विषय देण्यात आले, तर चित्रकलेच्या माध्यमातून महापुरुषांचे चित्र रेखाटन, लहान गटासाठी नैसर्गिक चित्र हे विषय देण्यात आले. या चित्रकला स्पर्धा आणि निबंध स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## आ.समाधान आवताडे यांनी पाहणी करत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मदतीच्या प्रशासनाला सूचना

# नंदेश्वर येथे अवकाळी पावसाचा मोठा फटका; बेदाणे शेडचे नुकसान, वीज पडून गाय दगावली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नंदेश्वर / प्रतिनिधी : मंगळवेढा तालुक्यातील नंदेश्वर परिसरात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकरी व नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अचानक झालेल्या पावसाने द्राक्ष उत्पादनासाठी उभारण्यात आलेल्या बेदाणे शेडचे मोठे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. याचदरम्यान नंदेश्वर येथील शेतकरी धोंडीराम गरंडे यांची गाय वीज पडून मृत्यूमुखी पडल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.

घटनेची माहिती मिळताच आमदार समाधान आवताडे यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. त्यांनी प्रत्यक्ष शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

यावेळी प्रांत अधिकारी बि.आर.माळी, तहसीलदार मदन जाधव, तालुका कृषी अधिकारी मनिषा मिसाळ, पंचायत समिती सभापती दिपाली ताड, जिल्हा परिषद सदस्य प्रदीप खांडेकर, उपनगराध्यक्ष येताळा भगत, पंचायत समिती सदस्य आप्पासाहेब निकम,मंडल कृषी अधिकारी बालाजी टेकाळे, कृषी पर्यवेक्षक ढाने, सहाय्यक दिपक कोकरे, तलाठी महेश राऊत, पशुधन विकास अधिकारी कुंभार, माजी नामदेव जानकर, दादासाहेब दोलतडे, अशोक चौंडे, भारत गरंडे, दामाजी बंडगर, राहुल कसबे, ज्ञानेश्वर गरंडे, जयसिंग कांबळे, दत्ता साबणे, नानासाहेब बंडगर, मायाप्पा गरंडे, आण्णासाहेब बंडगर, आण्णासाहेब पाटील, सिद्धेश्वर डांगे तसेच स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.





यावेळी आमदार समाधान आवताडे म्हणाले, नंदेश्वर परिसरात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शासनाच्या माध्यमातून बाधित शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळवून देण्यासाठी मी स्वतः पाठपुरावा करणार आहे. प्रशासनाने पंचनामे जलद गतीने पूर्ण करून एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

आमदार आवताडे यांनी प्रशासनाला तातडीने हालचाल करण्याचे आदेश देत, नुकसानग्रस्त पिकांचे, घरांचे तसेच मृत जनावरांचे पंचनामे त्वरित पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील सर्व बाधितांना शक्य तितक्या लवकर आर्थिक मदत मिळवून देण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले. या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असून, शासनाने तात्काळ मदत जाहीर करावी अशी मागणी स्थानिक शेतकरी व नागरिकांकडून होत आहे.